# उल्हासनगर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६, विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com

दिनांक : २७/०९/२०२४

## प्रेसनोट

आज शुक्रवार दि. २७ सप्टेंबर, २०२४ रोजी दुपारी श्री.विकास ढाकणे, प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी उल्हासनगर महापालिका क्षेत्रामधील मनपा शाळा क्र. १३, १८, १९, ५ व २१ या शाळांना भेटी दिल्या. सदर भेटी दरम्यान मा. आयुक्त महोदय यांनी शाळेमधील शैक्षणिक गुणवत्तेचा व उपलब्ध सोयी सुविधांचा आढावा घेतला.

उल्हासनगर शहरामध्ये विविध प्रभागामधील महानगरपालिकेच्या शाळांमध्ये एक CBSC बोर्डाची शाळा, एक इंग्रजी माध्यमाची शाळा व "मुख्यमंत्री -माझी शाळा सुंदर शाळा" योजने अंतर्गत ३ आदर्श शाळा करण्याचे नियोजीत आहे. या शाळांबाबत नियोजना प्रमाणे कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने मा. आयुक्त महोदय यांनी संबंधितांना योग्य त्या सुचना दिल्या असून लवकरात लवकर कार्यवाही पुर्ण करुन शाळा सुरु करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. यावेळी श्री. दिपक धनगर, प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग, श्री.तरुण शेवकानी, शहर अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग व इतर संबंधित उपस्थित होते.

(छाया डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — माहितीस्तव,
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम अॅनालिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

Scanned with CamScanner